प्रजावाणी दि. 9.10.2025

# वाहनधारकांविरुद्ध पोलिसांची कारवाई; दोन लाख ९१ हजाराचा केला दंड वसूल

प्रतिनिधी • नांदेड



जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखा तसेच वजीराबाद व इतवारा पोलीस ठाण्याच्या वतीने अवैध प्रवासी वाहतूक तसेच विना वाहन परवाना चालणारी वाहने आणि स्टंटबाजी करणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध धडक कारवाईची मोहीम राबविण्यात आली आहे. यात वेगवेगळ्या गुन्ह्यात वाहनधारकांना दोन लाख ९१ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे यांच्यासह वजीराबाद व इतवारा पोलिसांच्या टीमने शहरातील वजीराबाद चौक, महावीर चौक, रेल्वे स्टेशन, कला मंदिर व इतर भागात गणवेश परिधान न केलेले ऑटो रिक्षा चालक यांच्यासह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करून मोहीम राबविली आहे. याशिवाय फटाफट आवाज करून स्टंटबाजी करणाऱ्या वाहनांवरही पोलिसांनी कारवाई केली आहे. अवैध प्रवासी वाहतूक व इतर गुन्ह्यांमध्ये एकूण १३० केसेस करून एक लाख ५९ हजार ५५० रुपयांचा दंड पोलिसांनी वसूल केला आहे.

७ ऑक्टोबर रोजी शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जगन्नाथ पवार तसेच इतवारा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने देगलूर नाका, जुना मोंढा व ढवळे कॉर्नर आदी ठिकाणी वाहनांची तपासणी केली असता अनेक वाहनधारकांकडे कागदपत्रे आढळून आली नाहीत तसेच ऑटो चालकांना गणवेश परिधान करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तरीसुद्धा अनेक ऑटोचालक गणवेश न घालता वाहने चालवीत होती. जुना मोंढा येथील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या फळांच्या गाड्यावरही कारवाई करण्यात आली आहे. वाहनांचे कर्ण कर्कश आवाज करणे प्रामुख्याने बुलेटला फटाफट आवाज येतील असे सायलेन्सर लावून ध्वनी प्रदूषण करण्याची काही तरुण वाहनधारकांची सवय आहे. या माध्यमातून स्टंटबाजी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, अशा वाहनधारकांनाही दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले आहे. इतवारा ठाण्याच्या हद्दीतही पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत १२६ गुन्हे नोंदवून त्यांच्याकडून एक लाख ३२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शहर वाहतूक शाखा वजीराबाद व इतवारा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त मोहिमेत भरधाव वेगात चालणाऱ्या वाहनावरही कारवाई करण्यात आली आहे.

## शेख इस्तीयाक मित्र मंडळातर्फे एसपींचा सत्कार



पिरबुऱ्हाणनगर येथे दोन दिवसांपूर्वी एका बालकाचे अपहरण करण्यात आले होते. भाग्यनगर पोलीसांनी अवघ्या २४ तासात मुलाचा शोध लावून पालकांच्या स्वाधीन केले. पोलीसांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल सामाजिक कार्यकर्ते शेख इस्तीयाक (एस.डी. रेहान) मित्र मंडळाच्या वतीने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा सत्कार केला. यावेळी शेख उमेर, सय्यद अजगर, मोहम्मद शरजील, फरहान अन्सारी, अहेमद आली आदी उपस्थित होते.